**रोजगार हमी योजना- जवाहर विहीर-**
**लाभार्थी निवडीची सुधारित पध्दती.**

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांकः जविका- २००२/प्र.६८/रो-१०
दिनांकः २४ मे,२००२.

पहा:-१) शा.नि.नि.वि.क्र.जविका-१२९८/प्र.१०४/रोहयो-१०,दिनांकः १.७.१९९९.
२) शा.नि.नि.वि.क्र.जविका-२०००/प्र.६/रो.१०, दिनांकः २४.८.२०००.

प्रस्तावना:-

रोजगार हमी योजनेखालील "जवाहर विहीर" कार्यक्रमांतर्गत लाभार्थी निवडीची पध्दती वर उल्लेखिलेल्या शासन निर्णय दि. १ जुलै १९९९ मधील अ.क्र.(८) येथे देण्यात आली आहे. सदर शासन निर्णय व मुख्यतः त्यातील अ.क्र.८ बाबत उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठाकडे रिट पिटीशन क्र. ५२२९/२०००, ९८/२००१, ९९/२००१, २४९/२००१ व २५१/२००१ अन्वये आव्हान देण्यात आले.या संदर्भात उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी रिट पिटीशन क्र. ५२२९/२००० मध्ये एकत्रित निर्णय दि. ३०.४.२००२ रोजी दिला. उच्च न्यायालयाने वर उल्लेखिलेल्या शासन निर्णय दि. १ जुलै १९९९ मधील अ.क्र.८ मध्ये सुधारणा करुन दि. ६ नोव्हेंबर २००१ पासून लागू करण्याबाबत आदेश दिले आहेत. सदर सुधारित निर्णय दि. ६ नोव्हेंबर २००१ पूर्वी ज्या लाभधारकांची निवड झालेली आहे त्याला बाधा न आणता दि. ६ नोव्हेंबर २००१ च्या पुढे लागू करण्याबाबत आदेश दिलेले आहेत. व सुधारित मार्गदर्शक तत्वाप्रमाणे दि. ६ नोव्हेंबर २००१ नंतर कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. यानुसार शासन पुढीलप्रमाणे आदेश काढत आहे.

.6.02

शासन निर्णय:

शासन निर्णय, नियोजन विभाग क्र.जविका १२९८/प्र.१०४/रो.१० दि.१ जुलै १९९९ मधील "अ.क्र.८- लाभार्थ्यांच्या निवडीची पध्दत," या शासन निर्णयाद्वारे, पूर्वलक्षी प्रभावाने दि.६ नोव्हेंबर २००१ पासून रद्द करण्यात येत आहे.

शा.नि. दि. १.७.९९ व २४.८.२००० मध्ये दिलेले इतर आदेश,सूचना,मार्गदर्शक तत्वे आहे त्याच राहतील.

लाभार्थी निवडीबाबत पुढीलप्रमाणे सुधारित पध्दत विहित करुन देण्यात येत आहे.

एक) निवड समित्या

जवाहर विहिर लाभार्थी निवडीसाठी जिल्हा व तालुका समन्वय समित्या पुढीलप्रमाणे स्थापन करण्यात येत आहे.

१) जवाहर विहीर लाभार्थी निवड जिल्हा समन्वय समिती.

| | |
|---|---|
| १) पालक मंत्री | अध्यक्ष |
| २) विधानसभेचे जिल्हयातील आमदार | आमंत्रित |
| ३) अध्यक्ष,जिल्हा परिषद | सदस्य |
| ४) उपाध्यक्ष जिल्हा परिषद | सदस्य |

002
2920

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी

५) जिल्हाधिकारी सदस्य
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सदस्य
७) अतिरिक्त मु.का.अ.जि.प. सदस्य
८) कार्यकारी अभियंता (सिंचन) जिल्हा परिषद सदस्य सचिव

| | |
|---|---|
| ५) जिल्हाधिकारी | सदस्य |
| ६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ७) अतिरिक्त मु.का.अ.जि.प. | सदस्य |
| ८) कार्यकारी अभियंता (सिंचन) जिल्हा परिषद | सदस्य सचिव |

**२) जवाहर विहीर लाभार्थी निवड तालुका समन्वय समिती**

| | |
|---|---|
| १) तालुक्यातील विधानसभेचे आमदार | अध्यक्ष |
| २) पंचायत समितीचे सभापती | सदस्य |
| ३) पंचायत समितीचे उपसभापती | सदस्य |
| ४) उपजिल्हाधिकारी (रोहयो) | सदस्य |
| ५) तहसीलदार | सदस्य |
| ६) गट विकास अधिकारी पंचायत समिती | सदस्य सचिव |

**टिपः-** एका तालुक्यात एकापेक्षा अधिक विधानसभेचे आमदार असतील तर ज्या विधान सभा सदस्यांच्या क्षेत्रात खेडयांची संख्या सर्वात अधिक असेल ते अध्यक्ष म्हणून राहतील व इतर सहअध्यक्ष म्हणून राहतील.

**दोन ) लाभार्थी निवडीची पध्दती**

| अ.क्र. | करावयाची कार्यवाही | कार्यवाहीस मुदत |
|---|---|---|
| १) | शासन प्रथमतः जिल्हयाचा लक्षांक संबंधित वर्षाकरिता निश्चित करील. | |
| २) | शासनाने विहित केलेल्या लक्षांकानुसार वर उल्लेखिलेल्या शासन निर्णय दि.१जुलै,१९९९ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुत्राप्रमाणे तालुकावार लक्षांक मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, निश्चित करतील व गटविकास अधिका-यांना कळवतील. | १५ दिवस |
| ३) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी वरील दोन मधे नमूद केल्याप्रमाणे तालुक्याचा लक्षांक कळविल्यावर, गट विकास अधिकारी, ग्रामपंचायत व पंचायत समितीच्या नोटीस बोर्डवर तालुक्याला मिळालेला लक्षांक व या योजनेचे लाभ घेण्याकरिता इच्छूक लाभार्थ्यांनी अर्ज, ग्रामपंचायतीकडे किती तारखेपर्यंत करावयाचा आहे हे जाहिर करील. ग्रामपंचायत ग्रामसभेच्या निदर्शनास आणून प्राप्त झालेले सर्व अर्ज गटविकास अधिका-यांकडे पाठवतील. | १५ दिवस |
| ४) | गट विकास अधिकारी हे वरील ३ मधे नमूद केलेल्या विहित कालावधीत लाभार्थ्यांचे अर्ज, ग्रामपंचायतीकडून गोळा करील व मुदतीनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची काळजी घेईल. | २१ दिवस |

५) गट विकास अधिकारी आलेल्या अर्जांची छाननी करुन सर्व अर्हताधारक अर्जदारांच्या नावाची यादी तालुकावार पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डवर लावतील. १५ दिवस

६) गट विकास अधिकारी सर्व अर्हताधारक अर्जदारांची यादी तालुका समन्वय समितीपुढे सादर करील. तालुका समन्वय समितीने तालुका लक्षांकाच्या दुप्पट लाभार्थ्यांच्या निवडीबाबत त्यांची शिफारस करावयाची आहे. १५ दिवस

७) तालुका समन्वय समितीने शिफारस केलेली लक्षांकांच्या दुप्पट असलेली लाभार्थ्यांची प्राथमिक यादी, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांचेकडे गट विकास अधिकारी सादर करतील व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, यादीची छाननी स्वतः अथवा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत करतील व शिफारस केलेल्या लाभार्थ्यांची पात्रता तपासून पाहतील व जवाहर विहिरींच्या मार्गदर्शक तत्वे व नियमाप्रमाणे पात्र आहेत याची खात्री करतील. १५ दिवस

८) वरील ७ प्रमाणे छाननी केलेली यादी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या जिल्हा जवाहर विहीर लाभार्थी निवड समितीपुढे सादर करतील. १५ दिवस

९) जिल्हा समन्वय समिती पूर्ण जिल्हयातील प्रत्येक तालुक्याच्या लक्षांकाइतके लाभार्थीची निवड करील. १५ दिवस

१०) तदनंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांनी प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करुन प्रशासकीय मान्यतेचे आदेश जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डवर लावावे. १५ दिवस

**(तीन)** वर नमूद केलेल्या सुधारित लाभार्थी निवड पध्दतीप्रमाणे शासन निर्णय नियोजन विभाग दि. १ जुलै १९९९ नुसार तसेच तदनंतर दिलेल्या लक्षांकास ही पध्दत दि ६ नोव्हेंबर,२००१ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

स. अ. जयवंत

( स.अ.जयवंत)
उप सचिव,नियोजन विभाग.

प्रति.